National Journal of
Hindi & Sanskrit Research

**ISSN: 2454-9177**
**NJHSR 2025;** 1(62): 248-251
© 2025 NJHSR
www.sanskritarticle.com

**डॉ. बन्सी लव्हाळे**
संस्कृत व कोशशास्त्र विभाग,
डेक्कन कॉलेज, पदव्युत्तर पदवी व
संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), पुणे

**Correspondence:**
**डॉ. बन्सी लव्हाळे**
संस्कृत व कोशशास्त्र विभाग,
डेक्कन कॉलेज, पदव्युत्तर पदवी व
संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), पुणे

# पालि काव्यशास्त्रातील भावांचे समीक्षात्मक अध्ययन

**डॉ. बन्सी लव्हाळे**

काव्यस्वरूपाचा साकल्याने विचार करणारे शास्त्र म्हणजे काव्यशास्त्र होय. काव्यशास्त्रालाच साहित्यशास्त्र, अलंकारशास्त्र, सौंदर्यशास्त्र अशा पर्यायी नावाने संबोधले जाते. या काव्यशास्त्राची परंपरा संस्कृतमध्ये फार मोठी आहे. आचार्य भरताच्या नाट्यशास्त्र या ग्रंथापासून ते पंडितराज जगन्नाथाच्या रसगंगाधर या ग्रंथापर्यंत ही परंपरा चालत आलेली दिसून येते. किंबहुना अलिकडच्या काळातही संस्कृतमध्ये काव्यशास्त्रीय ग्रंथांची रचना होत असलेली दिसून येते. परंतु पालिमध्ये अशी काव्यशास्त्राची परंपरा दिसून येत नाही. पालिमध्ये आचार्य संघरक्षित विरचित सुबोधालंकार हा एकमेव काव्यशास्त्रीय ग्रंथ आढळतो.

सुबोधालंकार हा पालितील एकमेव काव्यशास्त्रीय ग्रंथ असल्यामुळे तो विशेष महत्त्वाचा ठरतो. साधारण इ. स. च्या बाराव्या शतकात आचार्य संघरक्षितांनी श्रीलंकेत या अद्वितीय ग्रंथाची रचना केल्याचे दिसते. त्यावेळी श्रीलंकेत संस्कृत अध्ययनाची उत्तम परंपरा होती. आचार्य संघरक्षितांनी ही संस्कृत अध्ययनाची परंपरा जवळून पाहिली असावी. भामहाचा काव्यालंकार, दण्डीचा काव्यादर्श, मम्मटाचा काव्यप्रकाश यासारख्या अनेक संस्कृत ग्रंथांशी आचार्य संघरक्षितांचा जवळून परिचय झालेला असावा. श्रीलंकेतील प्रसिद्ध विद्वान् स्थविर शारिपुत्राच्या शिष्यमंडळीतील एक आचार्य संघरक्षित हे होते. बाराव्या शतकापर्यंत पालित काव्यशास्त्रीय ग्रंथाची निर्मिती झालेली नव्हती आणि सुबोधालंकार या ग्रंथानंतरही अशा प्रकारच्या काव्यशास्त्रीय ग्रंथाची निर्मिती झालेली दिसत नाही. त्यामुळे पालितील हा प्रथम आणि शेवटचा एकमेव काव्यशास्त्रीय ग्रंथ म्हणता येईल. संस्कृतच्या काव्यशास्त्रीय ग्रंथांप्रमाणेच सुबोधालंकार या ग्रंथातही काव्यतत्त्वांचे शास्त्रीय विवेचन आढळते.

आचार्य संघरक्षित विरचित सुबोधालंकार हा ग्रंथ पाच परिच्छेदात विभागलेला असून यात एकूण तीनशे एकाहत्तर गाथांची रचना केलेली आहे. पहिल्या परिच्छेदात एकूण ६८ गाथा, दुसऱ्या परिच्छेदात ४८ गाथा, तिसऱ्या परिच्छेदात ४८ गाथा, चौथ्या परिच्छेदात १७५ गाथा आणि पाचव्या परिच्छेदात ३२ गाथा आहेत.

सुबोधालंकारातील रसभावावबोध नामक पाचव्या परिच्छेदात भाव आणि रसांचे विवेचन आलेले आहे. काव्याच्या दृष्टीने रससिद्धांत हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. भाव, विभाव इत्यादी रसाचे हेतू असतात.[1] त्यामुळे रसनिरूपणापूर्वी भावांचे विवेचन आचार्य संघरक्षितांनी केले आहे, कारण रसप्रतीती होत असतांना रसाचे ज्ञान होण्याकरिता रसाला निमित्त असणाऱ्या भावादींचे ज्ञान होणे आवश्यक आहे.
काव्यशास्त्रांत 'भाव' या पदाचा प्रयोग अनेक अर्थाने झालेला दिसतो. आचार्य भरताच्या मते कवीच्या हृदयगत भावाला वाणी, अंग, मुख, राग तसेच सात्त्विक अभिनयाच्या द्वारा भावित करणारा 'भाव' असतो.[2] ध्वनिवादी असंलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनिच्या एका भेदाकरिता 'भाव' (भावध्वनि) पदाचा प्रयोग करतात.[3] नायिकांच्या सात्त्विक अलंकारातील एका अलंकाराला 'भाव' असे म्हटले जाते.[4] रसाच्या संदर्भात 'भाव' पदाचा प्रयोग विशिष्ट अर्थाने झालेला आहे. 'कवीच्या मनात असलेला भाव रसिकांच्या प्रतीतीस आणून देतो तो भाव.'[5] **'नाट्यं भावानुकीर्तनम्'** भरताने केलेल्या या नाट्यव्याख्येतून असे प्रतीत होते की, नाटक हे सर्वथा भावांवर आश्रित (अवलंबून) असते.[6]

निर्विकार मनांत कोणत्याही कारणाने कसलाही विकार जागृत झाला की त्यास भाव असे म्हणतात.[7] या भावाचा मनुष्याला निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळ्या स्थितीत निरनिराळा अनुभव येत असतो. आईला फार दिवसांनी मूल भेटले तर तिच्या मनांत आनंदाच्या लाटा निर्माण होतील. कोणी जीवलग मनुष्य अत्यवस्थ आहे असे समजले असता आपल्याला दु:ख झाल्याशिवाय राहणार नाही. मांसांचे तुकडे इकडे तिकडे पडलेले आहे, रक्ताचा सडा घातल्याप्रमाणे दिसत आहे, कुत्री हाडे चघळीत बसली आहेत, असे दृश्य दृष्टीस पडले तर आपल्या मनांत नक्कीच किळस उत्पन्न होईल. अशाप्रकारे सांगितलेल्या आनंद, दु:ख व किळस या चित्तवृत्ती जरी एकमेकांपासून भिन्न असल्या तरी त्या सर्व 'भाव' या एकाच सदराखाली येतात.

'**काव्यरसाभिव्यक्तिहेतव: (भावा:)**'[8] अर्थात भाव हे काव्यातील रसाच्या अभिव्यक्तीला कारणीभूत होतात आणि त्यांच्यापासून रस निष्पन्न होतात असे आचार्य भरताने म्हटलेले आहे. '**रसान् भावयन्ति इति भावा:**'[9] अशी व्युत्पत्तीही निर्दिष्ट केलेली आहे, यावरून अभिनवगुप्ताने '**काव्यार्थान् रसान् भावयन्तीति भावा:**'[10] अर्थात काव्याचे अर्थ म्हणजे रस असे म्हटले असून कवीच्या मनातील भाव म्हणजे असामान्य प्रतिभेमुळे त्याच्या चित्तात स्फुरणारी व साधारणीकरणामुळे प्रेक्षकांनी आस्वाद घेण्यास योग्य होणारी चित्तवृत्ती अशी व्याख्या केली आहे. काव्यार्थ म्हणजे रस ही अभिनवगुप्ताने केलेली व्याख्या नाट्यशास्त्राशी सुसंगत अशी आहे. भाव रसांना अभिव्यक्त करतात किंवा निष्पन्न करतात. भाव विभावांमुळे उत्पन्न होतात आणि अभिनयाच्या द्वारा प्रकट होणाऱ्या अनुभावांमुळे प्रेक्षकांना ते भाव प्रतीत होतात. चित्तवृत्तीचे जे विशेष त्यांना भाव संज्ञा देऊन अभिनवगुप्त स्थायी, व्यभिचारी तसेच सात्त्विक भावांना भाव मानतो.[11] लौकिक स्वरूपातील चित्तवृत्तीच वाचिक व इतर अभिनयांच्या प्रक्रियेने विकसित होऊन स्वत:ला अलौकिक स्थितीत आस्वादास योग्य करतात म्हणून त्या चित्तवृत्ती म्हणजेच भाव.[12]

आचार्य संघरक्षितांनी अभिनवगुप्ताचे अनुकरण करीत भावाचे प्रतिपादन केलेले दिसते. आचार्य संघरक्षितांनी केलेले भाव शब्दाचे लक्षण पुढील प्रमाणे –

**चित्तवुत्तिविसेसा तु भावयन्ति रसे यतो ।**

**रत्यादयो ततो भावसद्देन परिकित्तिता ।।**[13]

(अर्थ - रसांच्या संदर्भातील विशेष असे मनोव्यापार (चित्तवृत्ती) अभिव्यक्त करतात म्हणून भाव या शब्दाने रति इत्यादींना भाव या शब्दाने संबोधले गेले आहे.) चित्तवृत्तीचे जे विशेष त्यांना भाव संज्ञा देऊन रति इत्यादी स्थायी भावांचे विचेचन केलेले आहे.

आता हे भाव मनांत कसे उत्पन्न होतात ते पाहू. मनुष्याला जी पांच ज्ञानेन्द्रिये आहेत त्यांच्या योगानें आपल्याला सृष्टीतील निरनिराळ्या पदार्थांचे ज्ञान होत असते, पण या वस्तूंचा आपल्याशी विशेष संबंध आला असता त्यापासून होणारे सामान्य ज्ञान आपल्याला विशेष प्रकाराने जाणवते.

उदाहरणार्थ - पौर्णिमेचा चंद्र आपल्या कलांनी पूर्ण असा गगनात विराजमान आहे, त्याच्या चंद्रिकेच्या अमृतवर्षावाने सर्व पृथ्वी प्रसन्न झाली आहे. चोहीकडे मंद, शीतल व सुगंधित वायू वाहत आहे, अशी वैभवसंपन्न रात्र असतांना तिच्या दर्शनाने निरनिराळ्या व्यक्तीत निरनिराळे भाव उत्पन्न होतील. दिवसभर अभ्यास करून थकलेला विद्यार्थी त्या निशेकडे पाहून आपल्या प्रिय मित्रांबरोबर फिरायला जाण्यास उत्कंठित होईल, तर शापित यक्षाप्रमाणे कान्तेपासून दूर राहणारा एखादा विरही पुरुष चंद्राच्या शीतल चंद्रिकेने उल्हसित होण्याऐवजी रजनीचे ते वैभव पाहून विरहाग्नीने अत्यंत तप्त होईल. ही उत्कंठा किंवा हा ताप उत्पन्न होण्यास जी कारणे आहेत, त्या कारणांना काव्यशास्त्रज्ञांनी 'भाव' हे नाव दिले आहे.

आचार्य संघरक्षितांनी रसप्रक्रियेला कारण असलेल्या भावांचे विवेचन थोडक्यात केलेले आहे. आचार्य भरताने आठ स्थायी भाव, तेहतीस व्यभिचारी भाव आणि आठ सात्त्विक भाव अशा एकूण एकोणपन्नास भावांचा निर्देश केलेला आढळतो.[14] आचार्य भरताला अनुसरून इतर नाट्यशास्त्रज्ञांनी भावांचे एकोणपन्नास भेद सांगितले आहेत. आचार्य संघरक्षितांनी काव्यशास्त्रज्ञांना अनुसरून नऊ स्थायी भाव, तेहतीस व्यभिचारी भाव आणि आठ सात्त्विक भावांचा उल्लेख केलेला आहे.

'**तत्र ज्ञेयो विभावस्तु रसज्ञापनकारणम्**' अर्थात विभावाला रसज्ञापनाचे म्हणजेच रस जाणण्याचे कारण म्हटले आहे.[15] ज्यामुळे वाचिक, आंगिक, सात्त्विक अभिनयांच्या द्वारा स्थायी आणि व्यभिचारी भाव विभावित होतात म्हणजेच विशेष रूपाने ओळखले जातात त्याला विभाव म्हणतात. विद्वानांनी या विभावाचे आलम्बन आणि उद्दीपन असे दोन प्रकार कल्पिले आहेत. आचार्य संघरक्षितांनीदेखील परंपरेला अनुसरून सुबोधालंकार ग्रंथाच्या टीकेत '**आलम्बण-उद्दीपनवसेन दुविधो विभावो नाम, तत्थ आलम्बणविभावो कन्तादि, उद्दीपनविभावो चन्दादि** '[16] अशा दोन प्रकारच्या विभावांचा उल्लेख केला आहे.

**आलम्बन विभाव**

ज्याच्या आधाराने स्थायी भाव उद्बुद्ध होतात त्याला आलम्बन विभाव म्हणतात. **'एत्थ विभावो नाम रतिविसयेन नारीनं अञ्ञामञ्ञं आलम्बणविभावो'**[17] येथे नायक, नायिका आलम्बन विभाव होत.

**उद्दीपन विभाव**

ज्यांच्या द्वारा रत्यादी स्थायीभाव उद्दीप्त होतात त्यांना उद्दीपन विभाव म्हणतात. **'चन्दादि रम्मदेसादि उद्दीपनविभावो चेति'**[18] चांदणे, रमणीय प्रदेश, केशविन्यास, कोकिळेचे कूजन, उद्यान, नायक-नायिकांचे सौंदर्य इत्यादींचा समावेश उद्दीपन विभावात केला जातो.

**अनुभाव**

पात्रांच्या ज्या क्रिया किंवा जो व्यापार असतो त्याला अनुभाव म्हणतात. कटाक्ष, हसणे, हस्त संचालन इत्यादी चेष्टा 'अनुभाव' होत. ज्यांच्या द्वारा वाचिक, आंगिक, सात्त्विक अभिनय अनुभावित होतात म्हणजेच अनुभूतीला योग्य बनवले जातात त्याला अनुभाव म्हटले जाते.[19] आचार्य संघरक्षित अनुभावाचे लक्षण असे करतात -

**विभावो कारणं तेसु'प्पतियुद्दीपने तथा ।**

**यो सिया बोधको तेसं अनुभावो'यमीरितो ।।**[20]

[अर्थ - रत्यादी स्थायी भावांच्या उद्दीपनामध्ये कारणभूत गोष्टीला विभाव म्हटले आहे तसेच (तेसं) रत्यादी स्थायीभावांचा जो बोधक (कायिक, वाचसिक) व्यापार त्याला अनुभाव म्हणतात (तो अनुभाव होय.)] '**अनुभावो विकारस्तु भावसंसूचनात्मकः**'[21] अर्थात भावांची सूचना करणारा विकार म्हणजे अनुभाव, अशी व्याख्या धनंजयाने दशरूपकात केली आहे. थोडक्यात वाचिक, आंगिक चेष्टांना अनुभाव म्हटले जाते.

**व्यभिचारी भाव**

व्युत्पत्तीच्या आधारे व्यभिचारी भावांचे स्पष्टीकरण करताना आचार्य भरताने म्हटले आहे की ते रसांमध्ये विविधप्रकारे (वि) आणि अभिमुख होऊन (अभि) वावरतात. (चरन्ति) म्हणून त्यांना व्यभिचारी ही संज्ञा प्राप्त झाली आहे. याचा अर्थ रसाचा यथोचित परिपोष होण्यास व्यभिचारी भावांचा आविष्कार आवश्यक आहे. स्थायी भाव उद्‌बुद्ध झाला तर त्याचे अनुभाव आपोआप प्रकट होतात. परंतु परिपोष होऊन त्या स्थायी भावाची रसात परिणती व्हावी यासाठी सहचारिरूपात व्यभिचारी भाव अभिव्यक्त झाले पाहिजेत, कारण ज्याप्रमाणे सूर्य दिवसाला अथवा नक्षत्राला नेतो (नयति) म्हणजे तडीस नेतो, पार पाडतो त्याप्रमाणे व्यभिचारी भाव रसाला नेतात (नयन्ति) म्हणजे सिद्ध करतात. याचा अर्थ असा की अनुरूप व्यभिचारी भावांचा आविष्कार झाल्याशिवाय रसाची निष्पत्ती होत नाही. व्यभिचारी हा शब्द वि+अभि+चर या धातूपासून झालेला आहे. हे आपल्याला सुबोधालंकारातील पुढील लक्षणाद्वारे स्पष्ट होईल.

**तिरोभावाविभावादिविसेसेनाभिमुख्यतो ।**
**ये ते चरन्ति सीलेन ते होन्ति व्यभिचारिणो ।।**[22]

(अर्थ - जे स्वभावतः अव्यक्त आणि व्यक्त इत्यादी विशेषरूपाने स्थायीप्रती अभिमुख (उन्मुख) होऊन विचरण करतात, ते व्यभिचारी भाव होत.) 'वि' आणि 'अभि' हे दोन उपसर्ग आहेत आणि चर हा गत्यर्थक धातू आहे. वाणी, अंग आणि सत्त्व यांनी युक्त होऊन विशेषरूपाने अभिमुख होऊन स्थायीकडे जाणारे असल्यामुळे त्यांना व्यभिचारी म्हटले जाते. भावाच्या गतीला संचारित करतात म्हणून त्यांना 'संचारी भाव' सुद्धा म्हणतात.[23]

भरताने '**विविधमाभिमुख्येन रसेषु चरन्तीति व्यभिचारिणः**'[24] अशी व्यभिचारी भावाची व्याख्या केलेली आहे. म्हणजेच रसांमध्ये विविध प्रकारे (स्थायींना) अभिमुख होऊन संचार करतात म्हणून ते व्यभिचारी. भरताच्या या व्याख्येचा विरोध न करता जे भरताने सांगितले तेच स्वतःच्या वेगळया शब्दात मांडण्याची आचार्य संघरक्षितांची वृत्ती प्रत्ययास येते. व्यभिचारी भाव स्थायी भावांमध्ये यत्र तत्र संचरण करत असतात. त्यांचे कुठलेच निश्चित स्थान नसते. ते आवश्यकतेनुसार उत्पन्न होऊन विलीन होतात. एकच व्यभिचारी भाव अनेक स्थायी भावांचा पोषक होऊन संचरण करू शकतो.

धनंजयादी आचार्यांनी सुद्धा रसांमध्ये विविध किंवा विशेषरूपाने अभिमुख होऊन संचरण करणाऱ्या भावांना व्यभिचारी म्हटले आहे.[25] एका लौकिक उदाहरणावरून आचार्यांनी आपले मत स्पष्ट केलेले आहे. त्यांनी स्थायी भावांची तुलना समुद्राशी तसेच व्यभिचारी भावांची तुलना लाटांशी केलेली आहे. ज्याप्रमाणे समुद्रात लाटा उत्पन्न होतात आणि विलीन होतात त्याप्रमाणे व्यभिचारी भाव रत्यादी भावांचे पोषण करण्यासाठी उत्पन्न होतात आणि विलीन होतात.[26] 'उन्मज्जतः' आणि 'निमज्जतः' यावरून व्यभिचारी भावांचे इकडे तिकडे संचरण करणे सूचित होते तसेच अभिमुख शब्दावरून स्थायींचे पोषकत्व सूचित होते.

व्यभिचारी भावाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करून आचार्य संघरक्षितांनी पूर्व परंपरेला अनुसरून निर्वेद (उदासीनता, खिन्नता), तर्क (विचार करणे), शंका, श्रम (थकवा, खेद), धृति (धैर्य), जडता (निष्क्रियता), दीनता, उग्रता (हिंस्रपणा), अलसत्व (आळस), सुप्त (स्वप्नावस्था), त्रास (भीती), ग्लानि (थकवा, मरगळ), औत्सुक्य (अधीरता, उत्कंठा), हर्ष, स्मृति (स्मरण), ईर्ष्या (हेवा, मत्सर), विषाद (नैराश्य), अवहित्था (मनातील भाव लपविण्याचा बहाणा), चिंता, गर्व, अपस्मार (बेशुद्धी), अमर्ष (क्रोध), मद (बेहोशी, दारू चढणे), मति (विचार मग्नता), उन्माद (वेड), मोह (संभ्रम, चित्ताची निश्चलता, स्तब्धता), विबोध (जागे होणे), निद्रा (चिंतेचा नाश), आवेग (क्षोभ), व्रीडा (लज्जेसह), मरण, चपलतेसहीत, व्याधी (आजार) हे तेहत्तीस (व्यभिचारी भावांचे प्रकार) सांगितले आहेत.

अशा प्रकारे रसनिर्मितीस कारण होणाऱ्या भावांचे विवेचन आचार्य संघरक्षितांनी सुबोधालंकार या ग्रंथाच्या पंचम परिच्छेदात केले आहे.

**निष्कर्ष**

आचार्य संघरक्षित विरचित सुबोधालंकार हा पालिमधील एकमेव काव्यशास्त्रीय ग्रंथ आहे त्यामुळे त्याचे विशेष महत्त्व आहे. पालि भाषेतही सगळया प्रकारचे साहित्य असायला हवे, केवळ उपदेशात्मकच नाही तर त्यात शास्त्र, काव्यही असावे, या प्रेरणेनेच छन्दशास्त्र, अलंकारशास्त्र पालि भाषेतदेखील लिहिले गेले. त्यामुळे आपण असे म्हणू शकतो की संस्कृतमधील काव्यशास्त्रीय ग्रंथांच्या अध्ययनाने प्रेरित होऊन आचार्य संघरक्षितांनी या ग्रंथाची रचना केलेली आहे. पालि साहित्याच्या अभ्यासकांना वा त्रिपिटकात जी काव्ये आहेत त्याचा अभ्यास करतांना या काव्यशास्त्राचा उपयोग व्हावा ही आचार्य संघरक्षितांची भूमिका होती.

या ग्रंथाच्या स्रोतांचा शोध घेतल्यास असे दिसून येते की आचार्य संघरक्षितांनी भरतादी पूर्वसूरींनी मांडलेल्या सिद्धांताला अनुसरून पण स्वतःच्या शैलीत अगदी मोजक्या शब्दात त्याच संकल्पना मांडलेल्या आहेत. काव्य-संकल्पना मांडताना पूर्वसूरींचा उल्लेख केलेला दिसत नाही. टीकेत मात्र भरताचा उल्लेख केलेला आढळतो. नाट्यशास्त्र, काव्यालंकार, काव्यप्रकाश, दशरूपकादी काव्यशास्त्रीय ग्रंथांचा आचार्य संघरक्षितांवर पडलेला प्रभाव वेळोवेळी दिसून येतो. भावांच्या संख्येबाबत आचार्य संघरक्षितांनी कोणताही बदल केलेला दिसत नसून पूर्वसूरींना अनुसरूनच भावांचे विवेचन अगदी

थोडक्यात केलेले आहे. आचार्य संघरक्षितांनी प्रत्येक भावांच्या व्याख्या देऊन त्यांची केवळ यादी सांगितली आहे. संचारी भावांची संख्या भरतादी नाट्यशास्त्रज्ञांनी ३३ एवढी मानली. काही आचार्यांनी नवीन व्यभिचारी भावांची कल्पना केलेली दिसते. भानुदत्ताने छल नामक व्यभिचारी भावाचा निर्देश केला आहे.[27] भोजाने ईर्ष्या, शम, स्नेहादी, रामचंद्र-गुणचंद्रांनी क्षुत्, तृष्णा, मैत्री, मुदिता, श्रद्धा, दया, उपेक्षा, रति, सन्तोष, क्षमा, मार्दव, आर्जव, दाक्षिण्य इत्यादी व्यभिचारी भावांचा उल्लेख केलेला आहे. मात्र भरतादींना अनुसरून आचार्य संघरक्षितांनी व्यभिचारी भावांची संख्या ३३ एवढीच मान्य केलेली दिसते.

सुबोधालंकाराच्या अनुषंगाने आचार्य संघरक्षितांचे विशेष योगदान पालिला मिळाले आहे, कारण पालि साहित्याचा समग्रपणे विचार करता असे दिसते की अलंकार, गुण, रीती, रस, भाव, रसनिष्पत्ती इत्यादी काव्यतत्त्वांबाबत जो सूक्ष्मविचार संस्कृतमध्ये झाला तसा विचार पालित झालेला दिसून येत नाही. त्यामुळे पालितील ही उदासिनता जणू या ग्रंथामुळे कमी झालेली आहे.

आचार्य संघरक्षितांचे एकूणच अलंकारविषयक, भावविषयक, रसविषयक इत्यादी विचार आणि त्यांचे एकूण योगदान याचा एकत्रितपणे विचार केला असता त्यांच्या ठिकाणी असलेली सर्वसमावेशक अशी व्यापक दृष्टी दिसून येते. तेव्हा एक उत्तम कवी, रसिक, एक उत्तम काव्यशास्त्रज्ञ म्हणून विद्वानांनी तसेच अभ्यासकांनी आचार्य संघरक्षितांकडे पाहावे.

**संदर्भग्रंथसूची**

*Subodhālaṅkāra: Porāṇa-Ṭīkā (Mahāsāmi-Ṭīkā) by Saṅgharakkhita Mahaāsāmi; Abhinava-Ṭīkā (Nissaya) (anonymous).* Edited by Padmanabh S. Jaini. Oxford: The Pali text Society, 2000.

उपाध्याय, बलदेव. *संस्कृत साहित्य का इतिहास.* वाराणसीः शारदा मन्दिर, १९६८.

त्रिपाठी, रमाकान्त. *संस्कृत नाट्यसिद्धान्त.* वाराणसीः चौखम्बा विद्याभवन, १९६९.

देशपांडे, सरोज. *भरताचे नाट्यशास्त्र.* मुंबई: पॉप्युलर प्रकाशन, २०२३.

द्विवेदी, पारसनाथ, संपा.*नाट्यशास्त्र.* वाराणसी: संपूर्णानन्द विश्वविद्यालय, २००१.

पांडे, सुरुचि. *संस्कृत साहित्याचा इतिहास.* पुणेः ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था, २००३.

भट, गोविंद. *संस्कृत नाट्यसृष्टी.* पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६४.

लव्हाळे, बन्सी. “रसार्णवसुधाकर: एक अध्ययन.” पीएच्.डी. प्रबंध, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर पदवी व संशोधन संस्था, अभिमत विद्यापीठ, २०१८.

लाळये, पी. जी., संपा. *नवरसमञ्जरी - सूर्योदयकाव्यम्.* हैद्राबादः पी. जी. लाळये, १९७९

सुस्मिता. *भारतीय काव्यशास्त्र-परम्परा में सुबोधालङ्कार एक अनुशीलन.* पटनाः इम्प्रेशन पब्लिकेशन, २००९.

Wright, J. C. “The Pali Subodhālaṅkāra and Daṇḍin’s Kāvyādarśa.” *Bulletin of the School of Oriental and African Studies, University of London* 65, no. 2 (2002): 323–41. Accessed August 23, 2023.
http://www.jstor.org/stable/4145617.

**पाद टिप्पणी**

1 रसस्य हेतवो भावादय: । रसत. १.१

2 वागङ्गमुखरागेण सत्त्वेनाभिनयेन च। कवेरन्तर्गतं भावं भावयन्भाव उच्यते ।। नाशा. ७.२., २२.७

3 यदा कश्चिदुद्रिक्तावस्थां प्रतिपन्नो व्यभिचारी चमत्कारातिशयप्रयोजको भवति, तदा भावध्वनिः । ध्वन्या. २.३(१७५.८)

4 देहात्मकं भवेत्सत्त्वं सत्त्वाद्भावो समुत्थितः। भावात्समुत्थितो हावो हावाद्धेला समुत्थिता ।। नाशा. २२.६.

5 कवेरन्तर्गतं भावं भावयन्भाव उच्यते ।। नाशा. ७.२

6 नाशा. १.७३.

7 निर्विकारात्मकात्सत्त्वाद्भावस्तत्राद्यविक्रिया । दशरू. २.३३.

8 नाशा. ७.७ पूर्वीचे गद्य

9 नाशा. ७.३

10 नाशा. अवलोक ७.० (पृ.३६७)

11 भावशब्देन तावच्चित्तवृत्तिविशेषा एव विवक्षिताः तथा च एकोण-पञ्चाशता भावैः इत्यादौ तानेवोपसंहरिष्यति । अ.भा. नाशा.७.पृ ३४२

12 चित्तवृत्तय एव लौकिका वाचिकाद्यभिनयप्रक्रियारूढतया स्वात्मानम-लौकिकदशायामास्वाद्यं कुर्वन्तीत्यतस्ता एव भावा:। नाशा. ७.० अभिनव

13 सुबोधा. 5.३

14 तत्राष्टौ भावाः स्थायिनः, त्रयस्त्रिंशद् व्यभिचारिणः, अष्टौ सात्त्विका इति भेदाः। एवमेते काव्यरसाभिव्यक्तिहेतव एकोनपञ्चाशद् भावाः प्रत्यवगन्तव्याः ।

15 रसु. १.५९

16 आलम्बन-उद्दीपनवसेन दुविधो विभावो नाम । सुबोधा. पोराण. टीका पृ. २८५.१२

17 सुबोधा. अभिन. टीका. पृ. २८५.२२

18 सुबोधा. अभिन. टीका. पृ. २८५.२३

19 नाशा. ७.५

20 सुबोधा. ५.११

21 दशरूपक ४.३

22 सुबोधा. ५.६

23 वागङ्गसत्त्वयुक्ता ये ज्ञेयास्ते व्यभिचारिणः। सञ्चारयन्ति भावस्य गतिं सञ्चारिणोऽपि ते ।। रसु. २.२

24 नाशा. ७.२८ पूर्वी.

25 विशेषादाभिमुख्येन चरन्तो व्यभिचारिणः। स्थायिन्युन्मग्ननिर्मग्नाः कल्लोला इव वारिधौ।।दशरू.४.७, भावप्र. १.पृ.२५-२६, साद. ३.१४०

26 उन्मज्जन्तो निमज्जन्त: स्थायिन्यम्बुनिधाविव। ऊर्मिवद् वर्धयन्त्येनं यान्ति तद्रूपतां च ते ।। रसु. २.३

27 अत्र प्रतिभाति छलमधिको व्यभिचारिभाव इति। रसत. ५.४४ पृ-६९